विभागीय चौकशीसाठी सादरकर्ता अधिकारी यांची
नियुक्ती करणेबाबत.(श्री.शंकर बापुराव भालेराव
तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत
निमगावजाळी तालुका संगमनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-३/४७७/२०२६.
दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ- १. या कार्यालयाचे सेवानिलंबन आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२५७/२०२४ दिनांक ०३/१०/२०२४
२. या कार्यालयाचे ज्ञापन दिनांक ०१/०४/२०२५
३. श्री.शंकर बापुराव भालेराव ग्रामपंचायत अधिकारी यांचा दोषारोप खुलासा दि.१५/०५/२०२५.
४.या कार्यालयाकडील आदेश क्र.ग्रापं-३/१३५३७३३, दिनांक २१/०६/२०२५.
५.गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१८०९/२०२६, दिनांक ११/०९/२०२६.
६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)

उक्त संदर्भ क्रमांक ४ च्या आदेशान्वये श्री.शंकर बापुराव भालेराव तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत निमगावजाळी तालुका संगमनेर यांचे प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेत येऊन चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.सदानंद लहानू डोखे, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती संगमनेर यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.५ नुसार श्री.सदानंद लहानू डोखे, विस्तार अधिकारी (पं)हे दिनांक ३१/०७/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहे. तरी श्री भालेराव यांच्या विभागीय चौकशीकामी सादरकर्ता अधिकारी श्री. सदानंद लहानू डोखे, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती संगमनेर यांच्या ऐवजी श्री कासार राजेंद्र मधुकर, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती संगमनेर यांची सादरकर्ता अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक ४ च्या आदेशातील अटी व शर्ती जशास तसे लागु राहतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202611040806294 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 15:37:43
आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक
२) श्री कासार राजेंद्र मधुकर, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती संगमनेर
द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर

२/- सदर आदेशाची प्रत श्री कासार राजेंद्र मधुकर, विस्तार अधिकारी (पं) यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.